भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये **Rs. 100**

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ TC 802360

0 5 MAY 2018

उप कोषागार अधिकारी, आंबेगाव

अनु.क्र. ९४६४ दिनांक ५/५/१८ रक्कम १००

मुद्रांक कोणत्या कारणासाठी घेतला आहे. करार

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्र.

मुद्रांक धारकाचे संपूर्ण नाव अध्यक्ष सचिव

संपूर्ण पत्ता मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता बाळासाहेब मंचर धोंडिभाऊ पोखरकर

मुद्रांक धारकाची / हस्ते व्यक्तीची सही / अंगठा

श्री.विठ्ठल मारुती पाचपुते
परवाना धारक मुद्रांक विक्रेता,प.क्र.२२०२००५
परवान्याची मुदत दि.३१ मार्च २०२१
फोरम मार्केट, लक्ष्मी रोड, हॉटेल विसाव्याच्या शेजारी, मंचर, आंबेगाव,पुणे.

## करारनामा ( वर्ष)

करारनामा आज वार दिनांक माहे सन २०१ इसवी ते दिवशी..

| | |
|---|---|
| मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था<br>नोंदणी रजि. नं. महा १०९/२०१८ पुणे<br>मुख्य कार्यालय — मंचर<br>ता. आंबेगाव, जि. पुणे<br>शाखा — तर्फे अध्यक्ष —<br>श्री. बाळासाहेब धोंडीभाऊ पोखरकर<br>वय. ३४ वर्षे, धंदा — व्यवसाय,<br>रा. पिंपळगाव खडकी, ता. आंबेगाव,<br>जि. पुणे | लिहुन घेणार |

यांसी.....

वैद्यकीय व्यवसायाचे नाव – प्रविण मेडिकल अँड जनरल
श्री./सौ – सोनाली दिपक भोसले
पदवी – D. Pharm
वय. ––  वर्षे, धंदा –
मोबाईल नं. – 9960974624, 9309199299
पत्ता – [illegible] नगर, ता. खेड, जि. पुणे, इल्को. कॉ. नं 9 समोर, निघोजे रोड

लिहुन देणार

**याकामी करारनामा लिहुन देतो की,**

करारनामा लिहुन घेणार 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था' ही सामाजिक उपक्रम राबविणारी संस्था नव्याने उदयास आलेली आहे. सदर संस्थेचे प्रमुख उदिदष्ट हे केवळ सामाजिक उपक्रम राबविणे आणि त्यातुन सर्वसामान्य नागरीकांना आवश्यक असलेल्या वैद्यकीय गरजांची सवलतीच्या दरात सर्वोतोपरी पुर्तता करणे हे आहे. त्याचंबरोबर सदर संस्थेच्या माध्यमातुन गरजु व गोरगरीब नागरीकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, समाजाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या समाजोपयोगी गरजांची शक्य तितक्या चांगल्या पध्दतीने व दर्जात्मक स्वरूपात पुर्तता करण्याचे कार्य सदर संस्थेच्या माध्यमातुन करावयाचे संस्थेचे उदिदष्ट आहे. सामाजिक बांधिलकीचे भावनेतुन संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब धोंडीभाऊ पोखरकर यांनी सदर 'मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थे'ची सुरूवात केली आहे.

सदर सेवाभावी संस्था ही संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये मान्यताप्राप्त संस्था आहे. सदर संस्थेचा परवाना संस्थांचे सहाय्यक निबंधक यांचेमार्फत सदरचे सेवाभावी संस्थेस प्राप्त झाला आहे.

सदर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातुन वेगवेगळया ठिकाणच्या दवाखाना/ हॉस्पिटल/ मेडीकल /क्लिनीकल लॅब/ सोनोग्राफी/एक्सरे/ डायग्नॉस्टिक सेंटर/रूग्णवाहीका सेवा/जनरीक मेडीकल/ब्लड बॅंक किंवा स्टोरेज यांना जोडण्याचा व यांचेमार्फत रूग्णांना सवलतीच्या दरात उपचारांची सुविधा देण्याचा विषेश प्रयत्न सदर संस्थेच्या माध्यमातुन करणेचा संस्थेचा मानस आहे. त्या दृष्टीने विशेषत: आंबेगाव, खेड आणि जुन्नर या तालुक्यांबरोबरच संपुर्ण महाराष्ट्र राज्याचे मर्यादिपर्यंत सदर संस्थेचे कार्यक्षेत्र राहणार आहे.

सदर संस्थेच्या माध्यमातुन समाजातील कुटुंबांना सभासद करण्यात येणार आहे. संस्थेच्या कार्यप्रणालीकरीता सभासदत्वाचे दयेक / निधी हा कुटुंबातील व्यक्तीपरत्वे आकारण्यात येणार आहे. सदर निधीचा/ दयेकाचा लाभ हा सदर सभासदत्व मिळणाऱ्या कुटुंबातील वैदयकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या सदस्यास मिळणार आहे.

१. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या सुविधेसाठी वैद्यकीय हॉस्पिटल / डॉक्टर डायग्नोस्टिक सेंटर/क्लीनीकल लॅब/रूग्नवाहीका सेवा/ सोनोग्राफी /एक्सरे/ जनरीक मेडीकल/ब्लड बॅक किंवा स्टोरेज व इतर वैद्यकीय सेवा आणि मैत्री हेल्थ केअर सेवा भावी संस्था यांचा ३ वर्षाचा लेखी स्वरूपात करार आहे.

२. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या येणाऱ्या सभासदाला / रूग्नांना आपल्या उपलब्ध सुविधेनुसार मी स्वतः दवाखाना/ हॉस्पिटल १५ ते संस्थेच्या गरजू सभासदांसाठी २० टक्के /मेडीकल १० ते १५ टक्के /क्लिनीकल लॅब २० टक्के/ सोनोग्राफी २० टक्के/ एक्सरे २० टक्के/ डायग्नॉस्टिक सेंटर २० टक्के/रूग्णवाहीका सेवा २० टक्के /जनरीक मेडीकल ३० ते ७० टक्के/ब्लड बॅंक किंवा स्टोरेज १० ते २० टक्के व इतर वैद्यकीय सेवा सवलतीमध्ये एकुण बीलावर आरोग्य सुविधा सवलत देण्यास तयार आहे. तसेच माझ्याकडे असणाऱ्या सुविधेमध्ये संस्थेच्या नियम व अटीनुसार मी चर्चा करून हेल्थ चेकअप/ इतर सवलतीचे पॅकेज गोरगरीबांसाठी व सर्वसामान्य लोकांसाठी देण्याची माझी तयारी आहे. सदरचे पेपरपाठीमागे जोडले आहे.

३. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्थेच्या माध्यमांतुन ऑनलाईन, ऑफलाईन आरोग्य सुविधा घेण्यासाठी फॅमिली सभासद आल्यास त्याची पुर्वकल्पना एस.एम.एस अथवा कॉल करून दिली जाईल. परंतु ती कल्पना न दिल्यास येणाऱ्या रूग्णाची किंवा सभासदाची मी व्यवस्थित शहानिशा करून त्यास मी सवलत देईन.

४. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था व दवाखाना/ हॉस्पिटल/ मेडीकल /क्लिनीकल लॅब/ सोनोग्राफी/ एक्सरे/ डायग्नॉस्टिक सेंटर/ रूग्णवाहीका सेवा/ जनरीक मेडीकल/ब्लड बॅक किंवा स्टोरेज यांनी एकमेकांशी एका विचाराने राहणे बंधनकारक राहील. एकमेकांची चुकीची माहीती संस्था व / स्वतः हॉस्पिटल यांनी दिल्यास संस्था

किंवा आम्ही जबाबदार राहु. इतर कोणीही चुकीची माहीती अथवा अफवा कोणत्याही माध्यमातुन पसरविल्यास किंवा पसरल्यास त्यावर संस्थेने किंवा आम्ही विश्वास ठेवणार नाही. त्याकरीता संस्था व आम्ही एकमेकांशी एकनिष्ठ राहणे दोघांचेही हितावह आहे.

५. मी स्वत: व मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्याशी झालेल्या वैयक्तीक चर्चा पुर्वकल्पना नियम व अटी या आमच्या वैयक्तिक पातळीवरती राहतील.

६. मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातुन आरोग्य सुविधा घेण्यासाठी सभासद अथवा रूग्ण मेडीक्लेम अथवा कोणत्याही इन्शुरन्स कंपनीचा अथवा इतर कोणत्याही डॉक्टरांचा रेफर असल्यास संस्थेचा सभासद/ रूग्णास आम्ही संस्थेच्या नियमानुसार सवलत देण्यास तयार आहोत.

७. वैद्यकीय सेवेतुन जनसेवा हिच ईश्वरसेवा असे मानुन आपण सर्वांनी चांगले उत्कृष्ठ व दर्जात्मक कार्य करणेस गरजुंना आवश्यक असलेली सुविधा पुरविणे व इतर मदत करण्यास सदैव तत्पर असणे आवश्यक आहे.

वर करारनाम्यामध्ये नमुद केलेला संपुर्ण मजकुर आम्ही लिहुन देणार आणि लिहुन घेणार यांनी वाचुन, समजुन, उमजुन त्यावर राजीखुशीने स्वाक्षरी केली आहे. माहीतीपत्रक जोडले आहे.

वरील माहीती चुकीची आढळुन असल्याचे आढळुन आल्यास मी भारतीय दंड संहीता कलम १९३, १९९/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था मंचर रजि.नं. महा/१०९/२०१८/पुणे.

लिहुन घेणार

मैत्री हेल्थकेअर सेवाभावी संस्था

अध्यक्ष

लिहुन देणार

नाव सौ. सोनाली दिपक भोसले

DRUG LIC.NO
20-MH-PZ-4-4992
21-MH-PZ-4-49928
20C-MH-PZ-4-49929

मे.प्रविण मेडिकल & जनरल स्टोअर्स
तिन्हेवाडी रोड, राजगुरूनगर,